MHWS08001641-2025

## निशाणी ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी यांनी वाद मिळकतीच्या वापरास अडथळा व अडचण निर्माण करु नये याकरिता तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या हक्कात प्रतिवादींविरुध्द देण्याबाबत दाखल केला आहे.

**वादीचे कथन थोडक्यात असे आहे की,**

२. वादी हे मौजे केशवनगर येथील कायमस्वरुपी रहिवासी असून त्याच्याकडे त्याचे जीवनचरितार्थ चालविण्यातकरिता मागिल १५ वर्षापासून केशवनगर येथे बालाजी मंदीर येथील कमानीजवळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला लागून सुरुवातीला विठ्ठल वाघ यांचे अतिक्रमीत दुकान आहे व त्याला लागून वादीचे टीन शेडचे दुकान असून त्यामध्ये पानटपरीचा व डेलीनिड्सचा व्यवसाय वादी मागिल १५ वर्षापासून करत आहे. त्याच्या आजूबाजूला देखील इतर लोकांचे दुकाने आहेत व सदर दुकाने चालू स्थितीत आहेत. वादी यांची जागा १८ x १२ ची असून उत्तर – दक्षिण १८ फूट व पुर्व – पश्चिम १२ फुट अशी आहे. वादी मागिल १५ वर्षापासून सदर दुकानाचे मालक व ताबेदार म्हणून शांततामय वापरात आहे. दि.०५/०८/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, वाशिम यांनी वादीस कोणाच्यातरी सांगण्यावरुन बेकायदेशीररित्या नोटीस दिली. सदर नोटीसचे उत्तर वादी यांनी दिलेले आहे. असे असतांना दि.२९/०८/२०२५ रोजी सकाळी ०९.०० च्या सुमारास पोलीस स्टेशन, शिरपूर येथून वादीला फोन आला व सांगितले की, ग्रामपंचायत केशवनगर येथे तुमच्या विरुध्द तक्रार

आलेली आहे व ग्रामपंचायत यांनी अतिक्रमण काढण्याबाबत पोलीस संरक्षण मागितले आहे. वादीस असे समजले आहे की, प्रतिवादी हे राजकारणाचा गैरफायदा घेवून वादीची पानटपरी व डेलीनिड्सचे दुकान बेकायदेशीररित्या हटविण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यानंतर वादी यांनी ग्रामपंचायत येथे विचारपूस केली असता, सचिव व सरपंच यांनी बेकायदेशीर ठराव घेवून वादीचे वाद मिळकतीतील दुकान पाडण्याच्या तयारीत आहेत असे वादीस समजले. वास्तविक ग्रामपंचायत केशवनगर यांचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सदर मिळकत ही उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग वाशिम यांचा राष्ट्रीय महामार्ग क्र.४६१–बी मध्ये येत आहे. प्रतिवादी यांनी बेकायदेशीररित्या वादीचे दुकान हटविल्यास वादीचे न भरुन होणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी यांनी नि.क्र.१६ नुसार त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. सदर प्रतिवादी तर्फे कथन की, वादीने वाद मिळकतीवर अतिक्रमण केलेले आहे. वाद मिळकतीवर राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, वाशिम यांच्यामार्फत प्रवासी निवारा बांधण्यात आला होता. परंतु रिसोड मालेगाव रस्त्याचे काम चालू असतांना राष्ट्रीय महामार्गाने बस स्थानक पाडून टाकले व त्याठिकाणी नविन बस स्थानक करणार होते. त्याठिकाणी वादीने जून २०२५ मध्ये अतिक्रमण करुन पानटपरी टाकली. सदर बाब ग्रामपंचायतच्या लक्ष्यात येताच ग्रामपंचायतने दि.१०/०७/२०२५ रोजी ग्रामपंचायतची मासिक मिटींग घेवून त्यामध्ये सदर वाद मिळकतीवर चर्चा करण्यात आली व त्या मिटींगमध्ये बहूमताने वाद मिळकतीवरील अतिक्रमण काढण्यात यावे, याबबत ठराव झाला. त्यानंतर प्रतिवादीने दि.२७/०७/२०२५ रोजी वादीला नोटीस देण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी यांना पाठविले असता, वादीने नोटीस घेण्यास नकार दिला. त्यानंतर प्रतिवादीने दि.०४/०८/२०२५ रोजी बस स्थानकाचे काम त्वरीत करण्याबाबत राष्ट्रीय महामार्ग

कार्यालय, अकोला यांना अर्ज दिला. तसेच बस स्थानकातील अतिक्रमण काढण्याबाबत पोलीस स्टेशन, शिरपूर यांना कळविले. सदर अर्ज सर्व गावकरी यांच्यावतिने करण्यात आला, त्यावर ४८ गावकऱ्यांच्या सहया आहेत.

**४.** प्रतिवादीचे पुढे कथन की, ग्रामपंचायत केशवनगर यांनी जिल्हा अधिकार वाशिम, तहसिलदार रिसोड, गट विकास अधिकारी, रिसोड यांना दि.०५/०८/२०२५ रोजी व कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग, अकोला यांना दि.०४/०८/२०२५ रोजी विनंती अर्ज दिले आहेत. तसेच दि.०५/०८/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक यांना देखील अर्ज दिलेला आहे. वाद मिळकत ही वादीच्या मालकिची नसून वादीने अवैध्यरित्या त्याठीकाणी अतिक्रमण करुन गुन्हा केलेला आहे. दि.२६/०९/२०२२ रोजी वादीचे वडीलांना अतिक्रमण हटविण्यासाठी उपविभागीय अधिकारी राष्ट्रीयमहामार्ग यांनी नोटीस दिली होती त्यानंतर वादीच्या वडीलांनी पानटपरी काढून घेतली होती. मात्र जून २०२५ पासून वादी यांनी राष्ट्रीय महामार्ग व ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये व बसस्टॅडच्या हदीमध्ये बेकायदेशीररित्या टीन शेडची उभारणी करुन अतिक्रमण केलेले आहे. सदरचे अतिक्रमण हे बेकायदेशरी आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**५.** अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे स्वरूप पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्याचा निष्कर्ष मी कारणमीमांसेसहित नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे शाबीत करतात की, सकृतदर्शनी केस ही त्यांच्या बाजूने आहे ? | **नाही** |
| २ | वादी हे शाबीत करतात की, तात्पुरता मनाईचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे नुकसान होणार आहे ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ३ | वादी हे शाबीत करतात की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | **नाही** |
| ४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

- कारणमिमांसा -

६. वादीचे विधिज्ञ श्रीमती एस. व्ही. इप्पर व प्रतिवादींचे विधिज्ञ श्री. जी. एस. इंगळे यांचा युक्तीवाद ऐकला. वादी तर्फे नि.क्र.४ व २० वर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच प्रतिवादी तर्फे नि.क्र.१८ व २५ व कागदपत्रे दाखल केलेले आहेत. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

मुद्दे क्र. १ ते ३ करिता -

७. वरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेकरिता एकत्रित घेण्यात आलेले आहेत. मा. मुंबई उच्च न्यायालयाने **शामराव गणपत चिंतामणी विरुध्द काकासाहेब लक्ष्मण गोरडे २००८, (२) ऑल.एम.आर. ११८** यातील न्यायनिवाडयात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त ताकीद मंजूर करण्यासाठी सकृतदर्शनी स्थीती, सोईचे समतोलत्व व एखादयाचे न भरुन येणारे नुकसान या गोष्टी लक्षात घेणे गरजेचे असल्याबाबत मत व्यक्त केलेले आहे.

८. वरील कायदेशीर बाबी उभय पक्षांचे वरील परस्पर विरोधी कथने, त्यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा व वादी व प्रतिवादी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद याचे मी काळजीपुर्वक अवलोकन केले. वादीच्या कथनाप्रमाणे सदर वादमिळकतीमधील जागा ही राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, वाशिम यांच्या मालकिची आहे व वादी हे १५ वर्षापासून सदर

जागेवर पानटपरीचा व डेलीनिड्सचा व्यवसाय करत आहे. प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे वाद मिळकतीतील वादीचे दुकान हटवण्याच्या प्रयत्नात आहेत. वादी यांनी सदर वाद मिळकतीवर त्यांचे १५ वर्षापासून दुकान आहे, याबाबत मुन्ना चव्हाण, नागोराव नायक यांचे प्रतिज्ञापत्रे दाखल केलेले आहेत. मात्र कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वादीने सदर जागेवर त्यांचा कायदेशीर हक्क आहे अथवा सक्षम प्राधिकारणाकडून सदर जागेवर वादीस कायदेशीर कब्जे वहिवाटीचा अधिकार दिलेला आहे, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

९. प्रतिवादी हे ग्रामपंचायत केशवनगरचे सचिव व सरपंच आहेत. प्रतिवादींच्या कथनानुसार वाद मिळकतीवर वादीने जून २०२५ रोजी अतिक्रमण केलेले आहे. वास्तविक सदर जागा ही राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, वाशिम व ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये येत असून त्याठिकाणी बस स्टँड होते व प्रतिवादीने बेकायदेशीर अतिक्रमण केल्यामुळे प्रसास्यांचे तसेच विद्यार्थ्यांची अडचण होत आहे. प्रतिवादींतर्फे दाखल कागदपत्रांवरुन बस स्थानकातील अतिक्रमण काढण्याकरिता ग्रामपंचायत केशवनगर यांनी दि.१०/०७/२०२५ रोजी ठराव मंजूर केल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे दि.२७/०७/२०२५ रोजी वादीस ग्रामपंचायत हद्दीच्या बस स्थानकावर केलेले अतिक्रमण काढून घ्यावे, याबबत नोटीस काढल्याचे देखील दिसून येते. मात्र सदर नोटीस वादीकडून घेण्यास नकार दिलले आहे. ग्रामपंचायत केशवनगर यांनी वादी सोबत इतर अतिक्रमणधारक गोपाल तिवारी, संजय गाडे, विठ्ठल जाधव, कृष्णा गायकवाड, मंचकराव जाधव, संतोष मानवतकर व दिपक खोटे यांना देखील शासकिय जागेवरील अतिक्रमण काढूण घेण्याबाबत नोटीसा दिल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी बस स्थानकातील अतिक्रण काढणे व पोलीस संरक्षण मिळणे याकरिता प्रतिवादी ग्रामपंचायत केशवनगर यांनी तहसिल रिसोड, पोलीस अधिक्षक, वाशिम यांच्याकडे अर्ज देखील केल्याचे दिसून येतात. सदर वादी यांच्याविरुध्द केशवनगर गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत

सदस्य व गावातील ४८ लोकांनी पोलीस स्टेशन, शिरपूर यांच्याकडे विनंती अर्ज करुन वादी यांच्यामूळे गावातील शांतता भंग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याबबात अर्ज दिल्याचे दिसून येते.

**१०.** एकूणच वाद मिळकत ही शासकिय मालकिची जागा असल्याचे दिसून येते. वादीने सदर जागेवर त्यांचा कायदेशीर हक्क आहे अथवा सक्षम प्राधिकारणाकडून सदर जागेवर वादीस कायदेशीर कब्जे वहिवाटीचा अधिकार आहे, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रथदर्शनी वादीने वाद मिळकतीवर अतिक्रमण केल्याचे दिसून येते. प्रतिवादी हे ग्रामपंचायतचे सचिव व सरपंच आहेत. त्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ अन्वये शासकिय व सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे व त्यावरील अनाधिकृत अतिक्रमणे हटविने याबाबत कायदेशीर अधिकार आहेत तसेच ते त्यांचे कर्तव्य देखील आहे. ग्रामपंचायत केशवनगर यांनी तसेच राष्ट्रीय माहामार्ग उपविभाग, वाशिम यांनी देखील वादीस शासकिय जागेवरील अतिक्रमण काढून घ्यावे याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत. सदरच्या नोटीसा या वैधानिक अधिकारातून दिलेल्या असल्याने सदर नोटीसा या बेकायदेशीर आहेत असे म्हणता येणार नाही. एकूणच प्रथमदर्शनी वादी यांनी शासकिय जागेवर अतिक्रमण केलेले असल्याने वादी हे वाद मिळकतीबाबत कोणतेही संरक्षण मिळण्यास पात्र नाहीत. जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर केला तर ग्रामपंचायत अथवा शासकिय जागेवरील अतिक्रमणास संरक्षण दिल्यासारखे होईल. त्यामुळे वादी विनंतीप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळणेस पात्र नाही. त्यामुळे वादीच्या विनंतीप्रमाणे वादीस वाद मिळकतीबाबत तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे योग्य व न्यायाचे होणार नाही. एकूणच वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत केलेले नाही तसेच सोईचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे वादीच्या विनंतीप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे न्यायोचित होणार नाही.

**११.** नि.क्र.५ चे सदरच्या अर्जावर आदेश पारीत करताना करण्यात आलेली

कारणमिमांसा व काढण्यात आलेला निष्कर्ष हा फक्त या अर्जाकरिता मर्यादीत असून वादी व प्रतिवादी यांनी सदर दाव्याच्या गुणदोषावरील सुनावणीच्या वेळी सदर कारणमिमांसा किंवा निष्कर्षाने कोणत्याही प्रकारे बाधीत होण्याचे कारण नाही व ते दाव्यातील त्यांच्या कथनानुसार स्वतंत्रपणे पुरावा देणेस मुक्त राहतील. सबब मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.४ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज नि.क्र.५ नामंजुर करण्यात येतो.

२) अर्जाचा खर्च हा दाव्याचे अंतिम निकालावर निर्भर राहील.

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.02.13 17:08:51 +0530

(**दिनेश मु. गायकवाड**)

दि.१२/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Order**.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 12.02.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 12.02.2026 |
| Order uploaded on | : | 13.02.2026 |